# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१८/३७/५१९-ए.
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : ०२ एप्रिल,२०१८.

**<u>: कार्यालयीन आदेश :</u>**

राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत. अग्निशमन सेवांसाठी अग्निशमन केंद्र बांधणे, अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी करणे यासाठी शासनामार्फत निधी देण्यात येतो.

| अ.क्र. | योजनेचे नांव | नविवि शासन निर्णय क्र. व दिनांक |
|---|---|---|
| १ | राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्याबाबत. | क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१.०८.२००९. |
| २ | राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये जिल्हा योजनेतून "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हा स्तर)" राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना. | क्र.अशस-२०१०/प्र.क्र.१९९/नवि-२०, दिनांक ०१.०१.२०११. |
| ३ | १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती. | क्र.टिएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४, दिनांक ०३.०८.२०१५. |

०२. वरील योजनांमधून तसेच शासनाच्या अन्य योजनांमधून अग्निशमन सेवांच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनांमधून तसेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या स्वतःच्या निधीमधून खरेदी करावयाच्या अग्निशमन वाहने व उपकरणांसाठी आवश्यक तांत्रिक मंजूरी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेकडून देणे बंधनकारक आहे. त्यासाठी राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायतींकडून महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयास प्रस्ताव प्राप्त होतात. या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे तांत्रिक समिती गठीत करण्यात येत आहेत.

**<u>तांत्रिक समिती</u>**

१. श्री.राजेंद्र अ. चौधरी, उपप्रमुख अधिकारी (तांत्रिक) - अध्यक्ष
२. श्री.अनिल व्ही. परब, विभागीय अग्निशमन अधिकारी - सदस्य
३. श्री.किरण र.हत्याळ, वरिष्ठ प्रशिक्षक - सदस्य
४. श्री.प्रविण वि.हिंदळेकर, अधिक्षक - सदस्य सचिव

०२. वरील तांत्रिक समितीची कामे खालीलप्रमाणे असतील.

१. तांत्रिक समितीची बैठक महिन्यातून २ वेळा आयोजित करुन राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायतींकडून महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयास प्राप्त होणा-या प्रस्तावांची तांत्रिक तपासणी करावी.
२. तांत्रिक तपासणी झाल्यानंतर समितीने आपला अहवाल संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा तात्काळ सादर करावा.
३. तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार अग्निशमन सेवांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी करण्यासाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा हे महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायतींना तांत्रिक मान्यता देतील.
४. तांत्रिक समितीच्या सदस्यांना कोणत्याही प्रकारचा दैनिक प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

(प्र.सु.रहांगदळे)
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. श्री.राजेंद्र अ. चौधरी, उपप्रमुख अधिकारी (तांत्रिक), मुंबई अग्निशमन दल, मुंबई.
२. श्री.अनिल व्ही. परब, विभागीय अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, मुंबई.
३. श्री.किरण र.हत्याळ, वरिष्ठ प्रशिक्षक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई.
४. श्री.प्रविण वि.हिंदळेकर, अधिक्षक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई.